झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-३/झोपुआ/ ७४९/२०२३
दिनांक : ३१ /०८/२०२३

# अंतिम झोपडपट्टी निर्मुलन आदेश
## (महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ड अन्वये अंतिम अधिसूचना)

प्रस्तावना -

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **उक्त अधिनियम** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे;

(२) या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. ११/०९/२०१४ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे; आणि

(३) पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद गाव गाव मौजे रावेत, स.नं.१९२पै, १९३पै, १९४पै, सेक्टर नं.२९, प्लॉ.नं.४६ ते ५५, रमाबाईनगर झोपडपट्टी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टी क्षेत्रावर (पूर्णत:) अंदाजे क्षेत्रफळ १६४७६.१८ चौ.मी. (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे 'सदर मिळकत' असा करणेत येत आहे) हे क्षेत्र पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टयांच्या या प्राधिकरणाकडील यादीमध्ये समाविष्ट करणेत आलेले आहे;

(४) उक्त क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. आर.के.डेव्हलपर्स यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रस्ताव दाखल केलेला असून सदर प्रस्तावास झो.पु.प्रा., पुणे कडील नियमावली, २०१४ यातील नियम क्र. ४(५) च्या तरतूदीनुसार प्रशासकीय मान्यता देण्यात आले बाबत प्र.सहायक संचालक नगररचना यांनी दि.२४/०८/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सक्षम विभाग क्र.३, झो.पु.प्रा., पुणे यांना कळविले आहे;

(५) सदर क्षेत्रातील झोपडपट्टीचे सर्वेक्षण करण्यात येऊन झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट २) तयार करण्यात आली असून उक्त परिशिष्ट -२ नुसार सदर मिळकतीवर एकूण ४०४ झोपडया असून त्यापैकी निवासी पात्र ३१३, अपात्र ७७ व बिगर निवासी पात्र १, अपात्र २ आणि संयुक्त पैकी संयुक्त पात्र १, संयुक्त पैकी निवास पात्र ३, संयुक्त पैकी बिगरनिवासी अपात्र ३ या प्रमाणे एकुण ३१८ झोपडीधारक पुनर्वसनास पात्र ठरले आहेत;

(६) उक्त क्षेत्र दि.०६/०७/२०२२ रोजीच्या आदेशाद्वारे उक्त अधिनियमाच्या कलम ३क अन्वये **झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र'** म्हणून घोषित करण्यात आले असून सदरचा आदेश महाराष्ट्र शासन राजपत्र जुलै १४-२०, २०२२ पृष्ठ मध्ये क्र. ५१-५२ तसेच संध्या व दिवस-रात्रि या दैनिक वृत्तपत्रात दि.११/०७/२०२२ रोजी प्रसिध्द करणेत आला आहे तसेच सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा प्रत्यक्ष जागेवर दि. १२/०७/२०२२ रोजी डकविण्यात आला आहे; आणि

(७) सदर क्षेत्रावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत शिखर तक्रार निवारण समिती अथवा कोणत्याही न्यायालयाचा स्थगिती आदेश नाही आणि म्हणून, झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकामी

झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रातील इमारती / झोपड्या पाडून सदरचे क्षेत्र रिकामे करणे व उक्त अधिनियमाच्या कलम ३ड अन्वये पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे;

(८) विकसक मे. आर.के.डेव्हलपर्स यांनी रु.१००/- च्या मुद्रांकनावरील दि.१०/०८/२०२३ रोजीच्या हमीपत्रान्वये योजनेतील झोपडीधारकांच्या संक्रमण शिबीराची जबाबदारी घेतली असून सदर झोपडीधारकांना सेक्टर नं.२९ मधील स.नं.१९२ पै या मिळकतीवर संक्रमण शिबिर बांधून करणेत आलेली आहे

(९) सदरचे क्षेत्र झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची पुर्वसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र जानेवारी ५-११, २०२३ रोजी पृष्ठ क्र. ५, ६ व ७ वर तसेच दैनिक दिवस-रात्रि व दैनिक संध्या वृत्तपत्रात दि.१५/१२/२०२२ रोजी प्रसिध्द करणेत आली असून सदरची पुर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा प्रकारे योजनाक्षेत्रात दि.१५/१२/२०२२ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे;

(१०) सदर क्षेत्रातील उपरोक्त ३० दिवसांच्या कालावधीत रिकाम्या करण्यात न आलेल्या झोपड्यांचे / दुकानांचे सक्तीने निष्कासन करून ती जागा पुनर्वसन योजना राबविणेकामी मोकळी करणे आवश्यक आहे.

(११) मी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे उक्त अधिनियमाच्या कलम ३ड मधील नमूद तरतूदीन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र म्हणून अंतिमतः घोषित करीत आहे. तसेच सदरच्या क्षेत्रामधील उपरोक्त ३० दिवसांच्या कालावधीत रिकाम्या करण्यात न आलेल्या झोपड्यांचे / दुकानांचे सक्तीने निष्कासन करून या आदेशाची अंमलबजावणी करण्यास उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.३, झोपुप्रा पुणे यांना प्राधिकृत करीतआहे.

(१२) उक्त क्षेत्रातील सर्व झोपडीधारकांना प्रस्तुत आदेशाद्वारे कळविण्यात येत आहे की,

१) उक्त क्षेत्रावरील प्रत्येक झोपडी व बांधकाम या मधील झोपडीधारकांनी उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) अन्वये त्यांची झोपडी रिकामी करून झोपडी व त्याखालील जागा तात्काळ विकसकाच्या ताब्यात द्यावी.

२) पुर्वसूचनेमध्ये देण्यात आलेली ३० दिवसांची मुदत संपुष्टात आलेली असल्याने या कार्यालयामार्फत सदर क्षेत्रातील झोपडीधारकांचे यानंतर केंव्हाही सक्तीने निष्कासन करण्यात येईल. सक्तीने निष्कासित करण्यात आलेला कोणताही पात्र झोपडीधारक त्याचा संक्रमण कालावधीतील सदनिकेचा / भाडेपोटीच्या रकमेचा अधिकार गमावेल.

३) सदरच्या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात येईल व यापुढे सदर क्षेत्रातील झोपडीधारकांना निष्कासनासंदर्भातील कोणतीही स्वतंत्र नोटीस या कार्यालयामार्फत देण्यात येणार नाही.

४) कोणत्याही झोपडीधारकाने विहीत मुदतीत त्याची झोपडी रिकामी न केल्यास / झोपडीधारकाची योजनेस संमती नसल्यास / झोपडीधारकास योजना मान्य नसल्यास असा झोपडीधारक, मग तो पात्र असो अथवा अपात्र, उक्त अधिनियमाच्या कलम ३झ अन्वये त्याचा पुनर्वसनाचा अधिकार गमावून कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील.

५) उक्त अधिनियमाच्या कलम १२(८) अन्वये उपरोक्त नमूद मुदत संपण्यापूर्वी इमारत पाडून टाकण्यात आली नसल्यास इमारतीत प्रवेश करण्याचे व इमारत पाडून टाकण्याचे तसेच इमारतीतील सामानाची विक्री करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना तसेच त्यानी प्राधिकृत केले आहे अशा उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.३, झोपुप्रा पुणे यांना राहतील.

६) सदरच्या आदेशाचे पालन करण्यास कसूर करणारी कोणतीही व्यक्ती दोषसिद्धिअंती उक्त अधिनियमातील कलम ३७ अन्वये, ३ महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा १००० रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्हीस पात्र राहील.

सदरच्या आदेशामुळे व्यथित होणा-या कोणत्याही व्यक्तीस अथवा झोपडीधारकास उक्त अधिनियमाच्या कलम ३-ड सह कलम १२ (४) अन्वये ३० दिवसांचे आत शिखर तक्रार निवारण समिती, महाराष्ट्र शासन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा (पुर्व), मुंबई -४०००५१ यांचेकडे अपिल दाखल करता येईल आणि उक्त अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

## अनुसूची

महानगरपालिका क्षेत्र - पिंपरी चिंचवड महानगरपालिका.
झोपडपट्टीचे नाव - सेक्टर नं.२९, प्लॉ.क्र.४६ ते ५५. स.नं.१९२पै, १९३पै, १९४पै, रमाबाईनगर, रावेत.

| स.नं./ सि.स.नं. | जमीन / भोगवटादाराचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी) त्रिमीत पध्दतीने प्रत्यक्ष जागेवरील मोजणीनुसार ) | योजना क्षेत्राची चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| २ | ३ | ४ | ५ | | ६ | |
| सेक्टर नं.२९, प्लॉ.क्र.४६ ते ५५. स.नं.१९२पै, १९३पै, १९४पै (सदर मिळकतीबाब त नगरभूमापन झाले असून तेथील मिळकतीना सि.स.नं. देण्यात आले आहेत परंतु विहीत पध्दतीने मिळकत पत्रिका अस्तित्वात आलेल्या नाहीत.) | पिंपरी, चिंचवड महानगर पालिका | एकूण क्षेत्र १६४७६.१८ चौ.मी ( उपरोक्त क्षेत्रात ओपन स्पेसचे १२१९२.६१ चौ.मी. क्षेत्र समाविष्ट आहे.) | सि.स.नं. १३४ पै. | सि.स.नं. १३३पै, १३६पै व सरंक्षक भिंत | लागू रस्ता व सि.स.नं. १३७ पै. | सि.स.नं. १३२पै, १३०पै, १२९पै व लागूरस्ता |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :- / /२०२३

(नीलेश र. गटणे), (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत :- १. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांना माहितीस्तव सादर.

२. मा. आयुक्त, महानगरपालिका आयुक्तालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव.

a) उपआयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी.
b) सक्षम प्राधिकारी तथा सहायक आयुक्त, झोनिपु विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी.
c) क्षेत्रिय अधिकारी, 'ब' क्षेत्रिय कार्यालय, रावेत, पिंपरी चिंचवड महागनरपालिका, पिंपरी.

३. मा.आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे (PMRDA)- यांना पुढील कार्यवाहीस्तव.